| | | |
|---|---|---|
| महाराष्ट्र पोलीस | पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर<br>तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)<br>दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६<br>Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ९८ /२०२२ दि. १८/१०/२०२२

## "वाहतूक नियंत्रण अधिसुचना"

ज्याअर्थी, ठाणे शहरात सालाबादाप्रमाणे या वर्षीही दिनांक १८/१०/२०२२ ते दिनांक २६/१०/२०२२ या कालावधीत दिपावली सण साजरा होणार आहे. ठाणेनगर वाहतुक उपविभागाच्या हद्दीत प्राचीन काळापासूनची मोठी बाजारपेठ आहे. सदर ठिकाणी दिपावली सणाच्या निमित्ताने मोठया प्रमाणात खरेदीसाठी लोकांची गर्दी होत असते. त्यामुळे सदर परिसरात वाहतुक कोंडी होवू नये, वाहतुक सुरळीत व सुरक्षित रहावी,याकरीता आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी दत्तात्रय कांबळे, पोलीस उप आयुक्त, मुख्यालय ०१, अतिरिक्त कार्यभार पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून,महाराष्ट्र शासन गृहविभाग एम.व्ही.ए. –११६/सी.आर/३७/टी.आर. दि.०७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (अ) (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून वाहतूक नियंत्रण अधिसुचना जारी करीत आहे :–

**प्रवेश बंद:–** १) जांभळी नाक्याकडुन बाजारपेठेत जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना जांभळी नाका येथे प्रवेश बंद करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग:–** सदरची वाहने ही कोर्टनाका येथुन जांभळीनाका येथे उजवीकडे वळण घेवून टॉवरनाका मार्गे पुढे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद:–** २) खारकर आळीकडून बाजारपेठ जांभळी नाका कडे जाणाऱ्या सर्व वाहनांना महाजनवाडी येथे प्रवेश बंद करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग:–** सदरची वाहने ही खारकर आळी कडुन येऊन ठामपा व्यायाम शाळा येथुन महाजन वाडी हॉल लगत उजवीकडे वळुन एन.के.टी. कॉलेज मार्गे कोर्ट नाका मार्गे इच्छित स्थळी जातील

**प्रवेश बंद:–** ३) ठाणे ट्रेडर्स दुकानाकडुन,महंमद अली रोडने जांभळी नाका बाजुकडे येणाऱ्या मोटार सायकल वगळून सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंद करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग:–** सदरची वाहने ठाणे ट्रेडर्स दुकानाकडुन उजवीकडे वळुन महागिरी मशीदकडे वळुन इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद:–** ४)दादोजी कोंडदेव स्टेडीयम कडुन बाजारपेठ कडे जाणा–या सर्वप्रकारच्या वाहनांना स्टेडीयमजवळ प्रवेशबंद करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग:–** सदरची वाहने अग्नीशमन कार्यालय येथुन राघोबा शंकर रोड मार्गे पुढे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद:–** अशोक सिनेमा नॅशनल इलेक्ट्रॉनिक दुकानाकडुन बाजारपेठेत जाणाऱ्या मोटार सायकल वगळून सर्व प्रकारच्या वाहनांना ॲटीटयुड दुकाना जवळ प्रवेश बंद करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग:–** सदरची वाहने ही नॅशनल इलेक्ट्रॉनिक्स दुकान येथुन उजवीकडे वळून दत्त मंदिर सिडको स्टॅण्डकडुन इच्छित स्थळी जातील.

सदरची वाहतुक नियंत्रण अधिसुचना ही पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागु राहणार नाही. **सदरची अधिसुचना दिनांक १८/१०/२०२२ ते दिनांक २६/१०/२०२२ रोजी पर्यंत दररोज १४.०० ते २३.०० पावेतो पर्यंत अंमलात राहिल.**

( दत्तात्रय कांबळे )
पोलीस उप आयुक्त, मुख्यालय ०१, ठाणे शहर
अतिरिक्त कार्यभार
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

CamScanner

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदरची अधिसुचना राजपत्रात प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

मा. पोलीस आयुकत, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुकत, ठाणे शहर

मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे

मा. जिल्हाधिकारी, ठाणे

प्रत कार्यवाहीसाठी :–

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे

परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे

विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, परिवहन ठाणे

पोलीस उपआयुक्त, परिमंडळ–१, ठाणे व विशेष शाखा, ठाणे शहर

सपोआ ठाणे वाहतुक विभाग व पोलीस निरीक्षक ठाणेनगर, राबोडी, नौपाडा वाहतुक उपविभाग

प्रतः– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/– सदरची अधिसचुना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस. कक्ष,ठाणे

२/– सदरची अधिसचुना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

CamScanner